# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे - ४०११०१ दुरध्वनी क्र. २८१८११८२, २८१९२८२८.


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/कर/ ०५ /२४-२५ दि. २४ /०४ /२०२४

## आदेश

विषय :- तोडण्यात आलेल्या/ अस्तित्वात नसलेल्या, दुबार कर आकारणी असलेल्या मालमत्तांची आकारणी निर्लेखित करणेकरीता समिती गठीत करणे बाबत.

मालमत्ता कर हे महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत्र आहे. पुर्न:बांधणी, रस्ता रुंदीकरण, धोकादायक बांधकाम व इतर कारणास्तव तोडण्यात आलेल्या तसेच एकाच मालमत्तेस दुबार कर आकारणीची नोंद असलेल्या मालमत्तांची कर आकारणी निर्लेखित न झाल्याने मालमत्ता कराची मागणी मध्ये मोठया प्रमाणावर थकबाकी व त्यावर वाढत जाणाऱ्या व्याज रक्कमेमुळे मालमत्ता कराच्या मागणी रक्कमेत नाहक फुगवटा निर्माण होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. वार्षिक अंदाजपत्रकात सदरची रक्कम दर्शविल्यामुळे त्यानुसार विकासकामे काढली जातात. त्यामुळे मोठया प्रमाणावर SPILL OVER ची पद्धत नाईलाजास्तव निर्माण होत आहे. ते योग्य नाही. वार्षिक अंदाजपत्रकाचा योग्य ताळमेळ बसविण्यासाठी अचुक मागणीची रक्कम दर्शविणे आवश्यक आहे.

त्यामुळे सदर निर्लेखित करावयाच्या मालमत्तांच्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करणेकरीता प्रभाग कार्यालय व मुख्य कार्यालय स्तरावर खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

**(अ) प्रभाग कार्यालय स्तर**

| अ.क्र. | अधिकारी/ कर्मचारी पदनाम | समिती पद |
|---|---|---|
| १ | सहा. आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी | अध्यक्ष |
| २ | कनिष्ठ अभियंता | सदस्य |
| ३ | कर निरीक्षक | सदस्य |
| ४ | वसूली वॉर्ड लिपीक | सदस्य |

**(ब) मुख्य कार्यालय स्तर**

| अ.क्र. | अधिकारी/ कर्मचारी पदनाम | समिती पद |
|---|---|---|
| १ | अतिरीक्त आयुक्त (कर) | अध्यक्ष |
| २ | मुख्य लेखा परिक्षक | सदस्य |
| ३ | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | सदस्य |
| ४ | उप-आयुक्त (कर) | सदस्य |
| ५ | सहा. आयुक्त (कर) | सदस्य |

वरील प्रमाणे प्रभाग कार्यालय स्तवरावरील समितीमधील वसूली वॉर्ड लिपीक यांनी सर्व प्रथम प्रभाग कार्यालयातील कनिष्ठ अभियंता यांचे समवेत प्रत्यक्ष जागेवर जाऊन मालमत्तेची पाहणी करुन वसूली लिपीक यांनी विहीत नमुन्यातील पंचनामा, स्थळ पाहणी करुन उपलब्ध अभिलेखनुसार अहवाल तयार करुन सदर मालमत्ता निर्लेखित करणेकरीता अहवाल तयार करुन पुढील कार्यवाही करीता कर

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे - ४०११०१ दुरध्वनी क्र. २८१८११८२, २८१९२८२८.


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दि. २४/ ०४ /२०२४

जा.क्र.मनपा/कर/ ०५ /२४-२५

तयार करुन सदर मालमत्ता निर्लेखित करणेकरीता अहवाल तयार करुन पुढील कार्यवाही करीता कर निरीक्षक यांचेकडे सादर करावे. तद्नंतर कर निरीक्षक यांनी सदर प्रस्तावावर स्वाक्षरीकरुन सहा. आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांची सदर प्रकरणावर मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करीता वसूली वॉर्ड निहाय एकत्रित गोषवारासह सर्व प्रकरणांची मुळ नस्ती मुख्य कार्यालयास सादर करावी.

निर्लेखित करावयाची प्रकरणे मुख्य कार्यालयास प्राप्त झालेनंतर सहा. आयुक्त (कर) यांनी सर्व कागदपत्रांची छाननी करुन परिपूर्ण असलेले अहवाल पुढील मान्यतेकरीता वरीष्ठ अधिकारी यांना सादर करावे. व परिपूर्ण नसलेले प्रकरणे अपुर्ण कागदपत्रांच्या तपशिलसह पुनश्च: प्रभाग कार्यालयास पाठविण्यात यावे. तसेच अंतिम मान्यता प्राप्त झालेल्या प्रकरणांच्या संगणकीय आज्ञावलीत नोंदी घेऊन मालमत्ता निर्लेखित करण्यात यावी.

वरील प्रमाणे गठित केलेल्या समितीने निर्लेखित करावयाच्या मालमत्तांच्या प्रलंबित प्रकरणांवर जलदगतीने कार्यवाही करुन मालमत्ता निर्लेखित करण्याची कार्यवाही करावी.

(संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,

१) अतिरीक्त आयुक्त (कर)
२) मुख्य लेखा परिक्षक
३) सहा. आयुक्त (कर)
४) सहा आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी (सर्व)
प्रभाग क्र. १ ते ६